GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# भारत आणि जग

**Dr. Manjiri Bhalerao**

Associate Professor & Head
Shri Balmukund Lohia Centre of Sanskrit & Indological Studies
Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.
manjirib24@gmail.com
Ph. 9422010782

*भारतातील व्यापारी, प्रवासी हे भारताच्या सीमा ओलांडून आशियातील विविध देशात खूप प्राचीन काळीच पोचले होते. इतिहासपूर्वकाळातील अशा प्रकारच्या संपर्काची तसेच संबंधांची झलक पश्चिम आशियातील तेव्हाच्या मेसोपोटेमिया आणि आजच्या अरब जगताशी असलेल्या व्यापाराच्या पुराव्यांमधून मिळते. काळाच्या ओघात या संपर्काचा परिणाम म्हणून अनेक देशातील स्थानिक संस्कृतीवर भारतीय धर्माची आणि संस्कृतीची छाप पडलेली स्पष्ट दिसते. यात आशिया खंडातील विविध देशांचा समावेश होतो. हे देश असलेल्या प्रदेशाला सामान्यपणे ' बृहत्तर भारत ' असे म्हणावे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. भारतीय धर्म, पुराकथा, कला, स्थापत्य, भाषा, लिपी अशा अनेक गोष्टींचा यामध्ये समावेश होतो .*

*ऐतिहासिक काळातील सर्वात विश्वसनीय नोंद ही सम्राट अशोकाच्या काळातील आहे. त्याने आपल्या मुलांना श्रीलंकेत धर्मप्रसारासाठी पाठवले होते. श्रीलंकेत या धर्माची मुहूर्तमेढ संघमित्रा आणि महेंद्र या त्याच्या मुलांनी इ.स.पूर्व तिसऱ्या शतकातच रोवलेली दिसते. तसेच फुनान म्हणजे इंडोचीनच्या भागात भारतीय संस्कृतीचा पहिला अविष्कार झाला असे आपल्याला चिनी इतिहासकार सांगतात. आजच्या कंबोडिया या देशातील हा भाग आहे ' . 'बीऊ-नाम्' चा आजचा चिनी उच्चार फुनान असा होतो. ते एक हिंदू राज्य होते आणि ते मेकोंग या नदीच्या खोऱ्यात वसले होते. इसवीसनाच्या पहिल्या शतकात कौन्डीण्य नावाच्या ब्राह्मणाने हे राज्य स्थापन केले, असे चिनी नोंदीवरून समजते . अशाच प्रकारचे विविध काळातील पुरावे विविध देशातून पुढे येऊन प्राचीन काळातील भारतीयांचा कसा सर्व दिशांना संचार होता हे आपल्याला स्पष्ट करून सांगतात. या लेखामध्ये प्राचीन भारतीयांच्या अशा मुशाफिरीच्या माहितीची साधने तसेच त्यामुळे झालेले परिणाम यांची चर्चा केली जाईल.*

***Keywords:*** *बृहत्तर भारत, कंबोडिया, श्रीलंका, इंडोनेशिया, मेकोंग, कौन्डीण्य, संघमित्रा, महेंद्र*

भारतातील व्यापारी, प्रवासी हे भारताच्या सीमा ओलांडून आशियातील विविध देशात खूप प्राचीन काळीच पोचले होते. अनेक देशातील स्थानिक संस्कृतीवर भारतीय धर्माची आणि संस्कृतीची छाप पडलेली स्पष्ट दिसते. यात आशिया खंडातील विविध देशांचा समावेश होतो. हे देश असलेल्या प्रदेशाला सामान्यपणे 'बृहत्तर भारत' असे म्हणावे असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. भारतीय धर्म, पुराकथा, कला, स्थापत्य, भाषा, लिपी अशा अनेक गोष्टींचा यामध्ये समावेश होतो .

भारतीय इतिहासात प्रागैतिहासिक काळात अशा प्रकारचे संपर्क झाल्याची उदाहरणे फारशी स्पष्ट नसली तरी इतिहासपूर्व काळात अशा प्रकारची अनेक उदाहरणे आपल्याला दिसून येतात. भारताच्या पश्चिमेला असलेल्या देशांशी भारताचा सागरी व्यापार सुरु होता हे सिद्ध करणारे अनेक पुरावे आता उजेडात आले आहेत. पश्चिम आशियामधील अरब देशांपैकी ज्यांना समुद्र किनारे आहेत त्यांच्याशी तर हा व्यापार होताच पण एकदा का बंदरांमध्ये माल उतरवला गेला कि नंतर खुश्कीच्या मार्गाने तो इतर भागातही पाठवला जात असे. आज जरी हे देश वेगवेगळे असले तरी प्राचीन काळी ते एका मोठ्या सांस्कृतिक आणि राजकीय विश्वाचे भाग असावेत. कुवेत, दुबई, शारजा, बहारीन, इराक या ठिकाणी झालेल्या उत्खननातून या बद्दलचे पुरावे पुढे आले आहेत. कुवेत मध्ये फैलाका नावाच्या स्थळी सापडलेल्या पुरातत्त्वीय अवशेषांमधून हे संबंध स्पष्ट दिसतात. (Dpt. Of Antiquities २०१९ : २४, २८ ). दुबईमध्ये झालेल्या विविध पुरातत्त्वीय उत्खननातसुद्धा आता त्यांचा भारतातील सिंधू संस्कृतीच्या स्थळांशी असलेला संपर्क दिसून आला आहे. (Husaain KhalidSaleh Mansoor २०१७ : ६७, ७३, १०६). सुमेरमधून (आजचे इराक) मिळालेल्या मातीच्या मुद्रांवरील लेखांमध्ये जो मेलुहा नावाचा उल्लेख येतो तो म्हणजे सिंधू संस्कृतीचा असावा असे अनेक अभ्यासकांचे मत आहे (Moorey १९९९: ३५२).

याच प्रमाणे आजच्या तुर्कस्थानात असलेल्या बोगाझ कोई या ठिकाणी मिळालेल्या एका तहाच्या लेखाचे महत्त्व अपरंपार आहे. साधारणपणे इ.स.पूर्व १४०० या काळातला हिटाइट आणि मितानी या दोन समूहातील युद्धानन्तरच्या तहाच्या अटी नोंदवलेला लेख. या लेखात सुरुवातीला ज्या देवतांचे साक्षीदार म्हणून उल्लेख आला आहे त्यामध्ये इंद्र, वरूण, मित्र यांचा समावेश होतो. वेदातील या प्रसिद्ध देवतांचा उल्लेख त्याकाळातील भारतीय संस्कृतीचा प्रसारच दर्शवतो. (देगलूरकर २०१५: ३४८)

खरे तर, फुनान, म्हणजे इंडोचीनच्या भागात भारतीय संस्कृतीचा पहिला अविष्कार झाला असे आपल्याला चिनी इतिहासकार सांगतात. आजच्या कंबोडिया या देशातील हा भाग आहे. 'बीऊ-नाम्' चा आजचा चिनी उच्चार फुनान असा होतो. हे एक हिंदू राज्य होते आणि ते मेकोंग या नदीच्या खोऱ्यात वसले होते. इसवीसनाच्या पहिल्या शतकात कौन्डीण्य नावाच्या ब्राह्मणाने हे राज्य स्थापन केले, असे चिनी नोंदीवरून समजते. तिथले स्थानिक लोक अतिशय मागासलेले होते. त्यांना कपडे घालण्यापासून सगळे कौन्डीण्याने शिकवले. तिथल्या सोमा नावाच्या स्थानिक नागवंशीय राणीशी लग्न केले. त्यानंतर तिथे भारतीय संस्कृतीचा झपाट्याने प्रसार झाला. कंबोडिया या देशात यांच्या वंशजांनी पुढे बौद्ध आणि हिंदू या दोन्ही धर्मांना राजाश्रय दिला. त्याचा परिणाम म्हणून बयोन, ता फ्रोम, बांते श्राय आणि अतिशय भव्य असे जगातले सर्वात मोठे मंदिर अंकोरवाट निर्माण झाले. बुद्ध, विष्णू, शिव, दुर्गा, लक्ष्मी, गणपती, नाग, इंद्र इ. आणि अजून अनेक भारतीय देवदेवतांची उपासना कंबोडियात लोकप्रिय होती असे आजच्या अवशेषांवरून सहज समजते. भारतीय कला, स्थापत्य, सामाजिक रूढी, परंपरा यांचा खूप मोठा प्रभाव या देशात पाहायला मिळतो. (गुप्ते २०२१ :१९)

अशा प्रकारच्या देशांच्या यादीमध्ये असलेला एक महत्त्वाचा देश म्हणजे श्रीलंका. ताम्रपर्णी, सिंहल देश अशा नावांनी प्रसिद्ध असलेला हा देश फार लवकर भारताच्या संपर्कात आला. तेथील महावंस या ग्रंथात दिलेल्या परंपरेनुसार इ.स. पूर्व ६व्या शतकात राजकुमार विजय आपल्या ७०० लोकांना घेऊन वंगदेशातून श्रीलंकेत आला. त्याआधी तिथे यक्ष आणि नाग लोक राहत होते. सम्राट अशोकाच्या काळात म्हणजे इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकात महेंद्र आणि संघमित्रा ही अशोकाची मुले धर्मप्रसार करण्यासाठी श्रीलंकेत गेली. त्यांनी श्रीलंकेमध्ये राजा तिष्य याला आणि इतर अनेक लोकांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. त्याच वेळेस गौतम ,बुद्धाला बोधगया येथे ज्या बोधिवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली होती, त्या बोधिवृक्षाची फांदी श्रीलंकेत अनुराधपुर इथे लावण्या आली . त्यानंतर श्रीलंकेत बौद्ध धर्माचा खूप मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. अनेक ठिकाणी स्तूप आणि विहार (भिक्षू निवास) बांधले गेले. लेणी कोरल्या गेल्या.

दक्षिण भारतातून तमिळ राजे श्रीलंकेवर हल्ला करून, त्यांच्यावर विजय मिळवून त्यांच्या काही भूभागावर राज्य करत असत. या बद्दलचे अनेक उल्लेख श्रीलंकेतील दीपवंस आणि महावंस या ग्रंथातून मिळतात. विजय नावाचा राजकुमार भारतातून श्रीलंकेत गेल्यानंतर बराच काळ स्थानिक राजांचे राज्य होते. नन्तर इ.स. पूर्व ३ऱ्या शतकाच्या शेवटी सेन आणि गुत्तिक या दोन तमिळ प्रमुखांनी स्थानिक राजा सुरतिस्स याचा पराभव करून अनुराधपूरवर ताबा मिळवला आणि सुमारे २२ वर्षे राज्य केले. त्यानंतर राजा सुरतिस्साचा वारस

https://www.gapbhasha.org/

'असेल' याने त्यांना हरवून गेलेले राज्य परत मिळवले. पण लवकरच त्याचा सुरुवातीच्या चोलांचा एक राजकुमार एल्लार (स्थानिक नाव एलालन) याने पराभव केला आणि इ.स.पूर्व ३ ऱ्या शतकाच्या शेवटी स्वत:ला श्रीलंकेचा राजा म्हणून घोषित केले. हा राजा अतिशय न्यायी आणि समजूतदार म्हणून प्रसिद्ध होता. नाते किंवा मैत्री न पाहता तो न्यायनिवाडा करत असे. असे म्हणतात की त्याच्या मुलाच्या रथाच्या चाकाखाली एक वासरू मेले, म्हणून त्याने त्याच्या मुलाला तसाच रथाच्या चाकाखाली मृत्यू यावा असा दंड ठोठावला. या राजाला श्रीलंकेच्या इतिहासात मोठा मान दिलेला दिसतो. त्याला ज्या दुटुगामुणु राजाने हरवले आणि श्रीलंकेचे राज्य परत मिळवले, त्याने सुद्धा राजा एलार याच्या मृत्युनंतर त्याच्या स्मरणार्थ स्तूप बांधला.

पुढे परत इ.स.च्या १० व्या शतकानंतर चोलांनी इथे आपला जम बसवला. राजराजा (१) चोल याने स्वतःला 'मुंमुडी-सोल-मंडलं' (तीन मुकुट असलेला – चेर, पांड्य आणि सिंहल देशाचा अधिपती) अशी उपाधी घेतली होती. त्यानंतर अनुराधपूरहून राजधानी पोलोनरुवा येथे नेली आणि तिचे नाव जनंतमंगलम असे ठेवले. हे राजराजा (१) चोलाचेही बिरूद होते. त्याचा अधिकारी तली कुमारन् याने महातित्थ (सध्याचे मन्नारजवळील मंतोट ) येथे एक शिवाचे मंदिर बांधले. त्याचे नाव राजराजेश्वर असे ठेवले. राजराजाच्या काळात पोलोनरुवा येथेही शिवाची मंदिरे बांधली गेली. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा राजेंद्र चोल (१) याने तर संपूर्ण श्रीलंका आपल्या अधिपत्याखाली आणली. त्यावेळेस खूप मोठ्या प्रमाणावर तमिळ लोक श्रीलंकेत वास्तव्यास गेले आणि तिथेच राहिले. पण या मोहिमेपेक्षाही राजेंद्राच्या कारकिर्दीत झालेली महत्त्वाची मोहीम म्हणजे शैलेंद्र साम्राज्यावरील स्वारी ही होय. आग्नेय आशियातील मलाया द्वीपकल्प, जावा, श्रीविजय (सुमात्रा) आणि त्याच्या आसपासची पन्नई, मलइयूर, इल्लंसोक, तसेच मप्पप्पलम, तलइत्तकोलम, इलामूरीदेशम्, मदमलिंगम, मनक्कवरम् तसेच कदारम, इत्यादी लहान लहान बेटे मिळून शैलेंद्र साम्राज्य बनले होते. राजेंद्राने त्यांच्या विरुद्ध आरमारी मोहीम काढली. ही मोहीम भारताच्या इतिहासात फार वैशिष्ट्यपूर्ण अशी होती. कारण अशा स्वरूपाची ही पहिलीच मोहीम होती. सुरुवातीला शैलेंद्र साम्राज्याशी राजेंद्राचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यात संघर्ष कशामुळे निर्माण झाला, हे माहीत नाही. त्याच्या आरमाराने बंगालचा भाग जिंकून घेतला. नंतर मलाया द्वीपकल्प ताब्यात घेऊन शैलेंद्र राजा संग्रामविजयोत्तुंगवर्मन् याचा पराभव केला व त्याची राजधानी कडारम जिंकून घेतली. अशा रीतीने राजेंद्राने शैलेंद्र साम्राज्य खिळखिळे केले. गंगेच्या किनाऱ्यापासून आग्नेयेकडे जावा, सुमात्रा, मलायापर्यंत आपली विजयपताका फडकाविली. या मोहिमेने चोल साम्राज्याचे सामर्थ्य परत एकदा प्रगट झाले.

त्यांच्या आधी खरेतर तमिळनाडूतील पल्लव, पांड्य या राजघराण्यातील लोकांनीही संपूर्ण दक्षिण आशिया, आग्नेय आशिया या भागात अनेक वेळा आधी व्यापाराच्या निमित्ताने आणि नंतर आपले आरमार पाठवून काही काही देशातील भाग ताब्यात घेतले होते. तिथे अनेक भारतीयांनी कायमस्वरूपी वास्तव्य करून भारतीय संस्कृती रुजवली. पुढे त्या देशांचे भवितव्य बदलले. तिथे इस्लामचा प्रभाव वाढला. पण भारतीय संस्कृतीचा प्रभाव काही कमी झाला नाही. थायलंड, लाओस, कंबोडिया, ब्रह्मदेश, श्रीलंका या देशांमध्ये आजही बौद्ध धर्म हा अधिकृत धर्म आहे. इंडोनेशिया आज जगातील सर्वात जास्त इस्लामी लोकसंख्या असलेला देश आहे पण तिथल्या संस्कृतीची नाळ भारताशी जुळली आहे. लोकांची नावे अजूनही रामायणातील व्यक्तिरेखांची असतात. राम नमाज पढताना दिसतो. पण त्यांना त्याबद्दल काहीच वाटत नाही. रामायण हे तिथेच घडले यावर त्यांचा गाढ विश्वास आहे.

'उगवत्या सूर्याचा देश' म्हणून प्रसिद्ध असलेला जपान हा अतिपूर्वेकडचा देश आकाराने जरी छोटासा असला तरी राखेतून उठणाऱ्या फिनिक्स पक्षासारखा आज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आकाशात भराऱ्या मारतो आहे. सतत बसणारे भूकंपाचे धक्के आणि दुसऱ्या महायुद्धात झालेली अतिप्रचंड हानी या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तीमुळे खचून न जाता जपान या देशाने आपला पुनर्जन्मच घडवून आणला आहे. भारतासारखीच ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या या देशाशी फार पूर्वीपासूनच भारतीयांचे नाते आहे. आज संपूर्ण जगामध्ये बौद्ध धर्माचे पालन करणाऱ्या देशांमध्ये सर्वात महत्त्वाच्या आणि प्रभावशाली देशांमध्ये जपानचे स्थान खूप वरचे आहे. भारत ही गौतम बुद्धाची जन्मभूमी असल्यामुळे भारतावर या देशाचे विशेष प्रेम आहे. भारतामध्ये बौद्ध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विविध सोयीसुविधा तयार करण्यासाठी मदत करायला जपान नेहेमीच अग्रेसर असतो आणि कोट्यावधी रुपयांच्या देणग्या देत असतो. अजिंठा, सारनाथ, बोधगया या ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी जपानने मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली आहे हे आपल्याला ज्ञातच आहे. नेपाळमध्येसुद्धा भूकंपानंतर ज्या वारसा स्थळांना हानी पोचली होती त्यांना जपान सरकारने मदतीचा हात देऊ केला आहे. हे सर्व करण्यासाठी त्यांच्या सांस्कृतिक विभागाचे त्यांचा धर्म आणि सांस्कृतिक वारसा जतन आणि संवर्धनाचे धोरण कारणीभूत आहे हे लक्षात घ्यायला हवे.

जपानमधील बौद्ध धर्माच्या प्रवेशाची, स्थिर होऊन स्वतःचे स्थान पक्के करायची कहाणी खूप रंजक आहे. जुन्या प्रस्थापित शिंतो धर्माचे स्थान डळमळीत करून हा नवीन बौद्ध धर्म जपानमध्ये प्रस्थापित झाला आणि त्या अनुषंगाने कला आणि स्थापत्याचे वैभव बहराला आले. जपानच्या इतिहासाच्या कथा जशा चीन मधील हानवंशीय राजांच्या काळातल्या ग्रंथात आढळतात, त्याचप्रमाणे 'कोजिकी' आणि 'निहोन शोकी' या ग्रंथांमध्ये येतात. तशाच प्रकारचा अजून एक ग्रंथ चीनमधील लियांग घराण्याचा (इ.स. ५०२ ते ५५७) इतिहास सांगण्यासाठी इ.स. ६३५ मध्ये लिहिला गेला. 'लियांग शु' (Book of Liang) असे त्याचे नाव होते. त्या ग्रंथातील नोंदीनुसार 'हुई शेन' नावाचा एक बौद्ध भिक्षू काबुलमधून इ.स. ४५० मध्ये चीनमध्ये आला आणि ४५८ मध्ये 'वा' (म्हणजे जपान) येथे आणि 'फुसांग' येथे गेला होता. 'फुसांग' हे काहींच्या मते एका वृक्षाचे नाव आहे तर काहींच्या मते एका प्रदेशाचे नाव आहे. 'लियांग शु' मध्ये अशी नोंद आहे कि इ. स. ४८५ मध्ये काबुलहून पाच बौद्ध भिक्षू जहाजाने जपानमध्ये आले होते. त्यांनी त्यांच्याबरोबर बौद्ध ग्रंथ, तत्त्वज्ञान, धार्मिक विधी इ. गोष्टी आणून स्थानिक लोकांना शिकवल्या. त्यांना आपल्या भौतिक जीवनातील मोह, तृष्णा यांचा त्याग करायला सांगितला. त्यांच्यावर या सर्वांचा खूप प्रभाव पडल्याने फुसांगमधील लोकांच्या परंपरा मोठ्या प्रमाणावर बदलल्या. साधारणपणे इ.स. च्या ६व्या शतकात बौद्ध धर्म जपानमध्ये पोचला असे सर्वसमान्यपणे मानले जाते. पण जर या ग्रंथाचा पुरावा ग्राह्य धरला तर तो प्रवेशाचा काळ अजून मागे जाऊ शकतो.

जपानमधील मंदिरस्थापत्य हे जरी चीनमधील मंदिरांच्या शैलीने प्रभावित झालेले असले तरीसुद्धा त्यामागची मूळ संकल्पना ही भारतीय आहे. भारतातील बौद्ध विहार आणि स्तूप या वास्तू असलेल्या संकुलाचेच एक रूप चीनमध्ये आढळते. विहार म्हणजे बौद्ध भिक्षूंना राहावयाची जागा. बरेचदा त्यांचा निवास वस्तीबाहेरच्या उपवनात किंवा बागेत असे. त्या बागेला 'आराम' अशी संज्ञा आहे. म्हणून विहारांना 'संघाराम' असेही म्हणतात. गौतम बुद्ध किंवा महत्त्वाचे बौद्ध भिक्षु यांच्या अस्थिंवर स्तूप उभारण्याची भारतात परंपरा होती. त्या स्तूपाच्या आसपास विहार किंवा संघाराम तसेच ग्रंथालय असलेली शैक्षणिक केंद्र, भोजनशाला, आरोग्यशाला इ. प्रकारच्या इमारती असत आणि ही धार्मिक केंद्रे शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित पावत. काळाच्या ओघात यामध्ये बरेच बदल झाले, विकास झाला. नालंदा, विक्रमशीला यासारखी मोठी विद्यापीठेही उदयाला आली. अशा प्रकारची बौद्ध स्थळांची रचना अनेक देशांमध्ये आढळते. श्रीलंका, चीन या सारख्या देशात भारतातून बौद्ध धर्म तुलनेने लवकर पोचला. तिथेही अशा प्रकारचे स्थापत्य असलेली मोठी मोठी स्थळे निर्माण झाली. चीनमधून कोरिया आणि जपान या देशांमध्ये अशा प्रकारचे स्थापत्य दिसले नाही तरच नवल म्हणावे लागेल. त्यामुळे जपानमध्ये बौद्ध स्थळांच्या विकासावर चीनी स्थापत्याचा प्रभाव जरी दिसला तरी तो मुळातला भारतीय विचार आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. काळाच्या ओघात अभिव्यक्ती जरी बदलली तरी संकल्पना तीच राहिली.

स्तूप म्हणजे बुद्ध किंवा आदरणीय बौद्ध भिक्षूंच्या अस्थिंवर उभारलेले स्मारक. या स्मारकातील अस्थी ज्यांच्या असत ते अतिशय विद्वान, आदरणीय आणि आदर्श असे व्यक्ती असत. त्यांच्या शारीर अवशेषांच्या अस्तित्त्वाने त्या स्थळावरच्या नवीन, तरूण भिक्षूंना प्रेरणा मिळावी या विचाराने बौद्ध वास्तू संकुलाच्या मधोमध हा स्तूप किंवा धातुगर्भ (धातू म्हणजे अस्थी, ज्याच्या आत अस्थी आहेत असा तो धातुगर्भ) आणि त्याच्या आसपास इतर स्थापत्याची निर्मिती होत असे. धातुगर्भ या शब्दाचे रूप पुढे दाउगब्ब-दागोबा – दगोबा – पगोदा - पॅगोडा असे बदलले. चीनमध्ये या वास्तूचे रूप थोडे थोडे बदलत गेले आणि जपानमध्ये जे पोचले ते त्याच स्वरूपात. आज जरी जपानमधील बौद्ध मंदिरांच्या शेजारी पॅगोडा दिसत असला तरी अगदी सुरुवातीच्या काळात मात्र बौद्ध वास्तूसंकुलाच्या मधोमध पॅगोडा असे आणि त्याच्या भोवतीने इतर इमारतींची उभारणी होत असे. त्याला जपानी भाषेत परंपरेने 'शिचिदो गारान' (शिचिदो म्हणजे ७ सभागृहे आणि गारान म्हणजे मंदिर) असे म्हणत असत. गारान या शब्दाचे मूळ भारतीय शब्द 'संघाराम' यात आहे. थोडक्यात स्तूपाच्या भोवती असलेल्या विविध प्रकारच्या इमारती. आज अशा प्रकारची रचना असलेले कोणतेही स्थळ जपानमध्ये दिसत नाही पण 'आसुका देरा' येथील मंदिराच्या परिसरात झालेल्या उत्खननावरून तेथील जुन्या इमारतींच्या रचनेचे एक काल्पनिक चित्र तयार केले आहे. त्यामध्ये एक पॅगोडा मधोमध दिसतो आणि त्याच्या भोवताली इतर इमारती दिसतात. अशाच प्रकारचे स्वरूप जुन्या बौद्ध

https://www.gapbhasha.org/

GRAND ACADEMIC PORTAL
RESEARCH JOURNALS

GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

ज्ञान: अध्ययन: परम्परा

वास्तूसंकुलांचे असावे असे अनेक विद्वान मानतात.
अशा प्रकारे संपूर्ण आशियात, पूर्व असो वा पश्चिम,भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब ठायी ठायी दिसून येते. या भारतीय संस्कृतीने प्रभावित झालेल्या देशांमधले साहित्य हे रामायण, महाभारत, हरिवंश, पुराणे, जातककथा इ. ग्रंथांवर आधारित आहे. तेथील कायदे आणि राजनीती हे मनुस्मृती, कौटिलीय अर्थशास्त्र इ. ग्रंथांवरच आधारित आहे. त्यामुळे इतक्या शेकडो वर्षांनी आजही या बृहत्तर भारतातील देशांचे सांस्कृतिक अधिष्ठान भारतीयच आहे हे स्पष्ट दिसते. या सर्वांचे श्रेय मात्र भारताबाहेर पडलेल्या भारतीयांनाच दिले पाहिजे !

त्याच्या कारकिर्दीच्या शेवटी सिलोन, चेर व पांड्य यांनी उठाव करून आपले स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला. पण राजेन्द्राने ते प्रयत्न हाणून पाडले. शेवटी शेवटी त्याचा पश्चिमेकडील चालुक्य राजा पहिला सोमेश्वर याच्याशी संघर्ष झाला. पण राजेन्द्राने त्याचाही पराभव केला. अशा प्रकारे आपल्या कारकिर्दीत राजेन्द्राने मोठमोठ्या मोहिमा करून चौफेर विजय मिळविला. त्यामुळे चोल साम्राज्याचा हा दबदबा सर्वत्र निर्माण झाला.

राजेन्द्राने आपल्या कारकिर्दीत राज्याच्या सीमा सतत वाढवीत ठेवल्या. तो महान विजेता होता. आपल्या विजयाच्या या स्मरणार्थ त्याने कडारंगोंड व गंगैकोंड अशा पदव्या

## संदर्भ :

**मराठी -**

[1] गुप्ते, रमेश शंकर (२०२१) *बृहत्तर भारत,* कॉंटीनेन्टल प्रकाशन, पुणे

[2] देगलूरकर, गो.बं (२०१५) *प्राचीन भारत – इतिहास आणि संस्कृती*, अपरांत प्रकाशन, पुणे

**English**

[1] Department of Antiquities & Museums at the National Council for Culture, Arts and letters (2019) *The Splendid Archaeology of Kuwait*, Kuwait

[2] Mansoor, Khalid Hussein Saleh (2017) *Sharjah Antiquities Tell the Story*, Sharjah Archaeology Museum (Sharjah Museums Department), Sharjah

[3] Moorey, Peter Roger Stuart (1999) *Ancient Mesopotemian Materials and Industries: The Archaeological Evidence*, Elsenbrauns